नों. क. महाराष्ट्र/३७३१/रत्नागिरी-एफ ३७१८/रत्नागिरी

“We believe they can!”

# आस्था सोशल फाऊंडेशन रत्नागिरी

## वार्षिक अहवाल वर्ष 2022-2023



लोकमत

वेळीच लक्षणे समजून घेतल्यास उपचार शक्य

### ‘स्वमग्न’ मुलेही जगू शकतात सर्वसामान्य मुलांसारखीच

समस्या स्वमग्नांच्या

भाग - १

शोभना कांबळे

लोकमत न्यूज नेटवर्क

रत्नागिरी : ० ते ६ या वयोगटातील स्वमग्न असलेल्या मुलांची लक्षणे वेळीच समजून घेतल्यास त्यांचे निदान होऊन वेळेवर उपचार होऊ शकतात. अशी मुले सामान्य मुलांसारखे आयुष्य जगू शकतात, हे जागतिक स्तरावरही सिद्ध झाले आहे. त्यामुळे अशा मुलांना समाजाच्या प्रवाहात येण्यासाठी वेळीच लक्षणे समजायला हवीत.

'स्वमग्न' म्हणजे ऑटस्टिक. १५० बालकांमागे एक स्वमग्न बालक जन्माला येते. माता ही जन्मापासूनच बाळ मोठे होईपर्यंत सावलीसारखी त्याच्यासोबत असते. त्यामुळे सामान्य बालकासारखे दिसत असलेल्या मुलामध्ये स्वमग्नतेची लक्षणे नाहीत ना, याची खात्री करायला हवी. अतिचंचल, अस्वस्थ किंवा निरुत्साही, निरर्थक हसणे, इतर मुलांमध्ये न मिसळणे, एकाच कृतीत किंवा स्वत: मध्ये रमणे, कुठलाही बदल न स्वीकारणे, नजरेला नजर न देणे, एकच कृती वारंवार करणे ही या मुलांमधील प्रमुख लक्षणे आहेत.

ही लक्षणे लक्षात आल्यास या मुलांना वाचा उपचार, भौतिक उपचार आणि आवश्यक ती औषधोपचार मिळाल्यास ती सामान्य जीवन जगू शकतात. स्वमग्न मुले सामान्य बालकांसारखी दिसतात. त्यांची स्मरणशक्तीही तल्लख असते. त्यामुळे या मुलांना अवयवांचा वापर करण्यासंदर्भात शिकविल्यास असे मूल सामान्य मुलाप्रमाणे जगू शकते. अनेक स्वमग्नी व्यक्ती थोर संशोधकही झाल्याची उदाहरणे आहेत. योग्य उपचार आणि ते वेळीच मिळाले तर ही मुले सामान्यांसारखी शिकू शकतात.

स्वमग्न मुले आपल्याच विश्वात रमलेली असल्याने ती इतरांच्या संपर्कात येत नाहीत, त्यामुळे त्यांच्या भाषेचा विकास होत नाही. आपल्याच क्रियेत ती रमत राहतात. त्यातून बाहेर पडण्यासाठी त्यांना थेरपीसोबत आैषधांचीही जोड आवश्यक असते. स्वमग्न मुलाच्या प्रमाणिकरणासाठी महत्त्वाच्या दोन चाचण्या आहेत, त्या झाल्यास वेळेवर या मुलांना उपचार मिळतील. ही मुले समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास चांगली मदत होईल.

- डॉ. शाश्वत शेरे, मनोविकार तज्ज्ञ, रत्नागिरी

आस्था सोशल फाऊंडेशन रत्नागिरी

ऑटिझम् काय आहे?

स्वमग्न मुलांची हेटाळणी न करता त्यांना पालकांनी किंवा समाजाने समजून घ्यायला हवे. तूही सामान्य मुलाप्रमाणे आहेस, याची जाणीव कृतीतून करून द्यायला हवी. त्याला भावनिक आधार द्यायला हवा.

#### जागरुक मास

१ या मुलांमधील लक्षणे वेळीच लक्षात येण्याच्या दृष्टीने रत्नागिरीतील आस्था सोशल फाउंडेशन गेल्या काही वर्षांपासून प्रयत्न करीत आहे. स्वमग्नता जागरुक मास (ऑटिझम अवेरनेस मंथ) यानिमित्ताने आस्था फाउंडेशनतर्फे या महिनाभरात जागृतीचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. पालकांमध्ये जागृती करण्यासाठी फाउंडेशनतर्फे प्रत्येक बाल रुग्णालयांमध्ये 'ऑटिझम काय आहे' असा फलक लावण्यात येणार आहे. यात याची लक्षणे कोणकोणती आणि ही लक्षणे आढळल्यास थेरपीसाठी कुठे संपर्क करावा, यासंबंधी सविस्तर माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे.


#### थेरपी नव्हतीच

२ पूर्वी लहान मुलांच्या पाळण्याच्या वरच्या बाजूला त्या मुलाची दृष्टी जाईल, असे खेळणे बांधलेले असे किंवा वाजणारा खुळखुळा आता कालबाह्य झालाय. ही अशी खेळणी बाळाच्या मनोरंजनाबरोबरच त्याचे कान आणि दृष्टी चांगली आहे ना, याची खात्री करून देत. त्याचबरोबर त्याच्या वाढीनुसार भाषेसह त्याच्यातील स्थित्यंतरे योग्य प्रकारे होतायत ना, हेही घरातील ज्येष्ठ महिलांकडून पाहिले जात असे. मात्र, त्याकाळी स्वमग्न मुलांसाठी आवश्यक असलेली थेरपी विकसित झालेली नव्हती.

दि 2 एप्रिल 2022 जागतिक स्वमग्नता दिनाच्या निमित्ताने ( world Autism awareness day ) आस्था सोशल फाऊंडेशन रत्नागिरी च्या वतीने दि. 1/04/2022 रोजी, आस्था विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे थेरपी सेंटर, छत्रपती शिवाजी स्टेडियम येथे दुपारी 12 वाजता "प्रेस कॉन्फरन्स "आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेमध्ये जागतिक स्वमग्नता दिनाच्या निमित्ताने समाजामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याच्या हेतूने वर्तमानपत्रातून समाजात स्वमग्नतेची लक्षणे, उपाय, रत्नागिरी जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या सेवा सुविधा त्याची माहिती देण्यात आली. या पत्रकार परिषदेत प्रिंट मीडिया व इलेक्ट्रॉनिक

मीडियाच्या पत्रकारांनी सहभाग घेतला व सर्व वर्तमान पत्रानी दि.2 एप्रिल रोजी मोठ्या प्रमाणात वर्तमान पत्रात बातम्या ऑटीझम बाबत जाणीव जागृती निर्माण केली.





आस्था सोशल फाऊंडेशन रत्नागिरी

"We believe they can!" मुख्य कार्यालय: ब्लॉक नं ८, सुमंत कॉम्प्लेक्स, चैत्रबन, नाचने रोड, रत्नागिरी, महाराष्ट्र, (भारत)
वेबसाईट: www.aasthasocialfoundation.com ईमेल: director@aasthasocialfoundation.com

प्रती , दिनांक 02/04/2022

मा.जिल्हा शल्य चिकित्सक

जिल्हा शासकीय रुग्णालय ,

रत्नागिरी ता.जि.रत्नागिरी.

विषय : जिल्हा शासकीय रुग्णालया कडून "ऑटिझम" ची तपासणी होऊन प्रमाणपत्र वितरण प्रक्रिया सुरु होणे बाबत .

संदर्भ :1) केंद्र शासनाची स्वमग्नता बाबत मूल्यमापन मार्गदर्शक सूचना बाबत अधिसूचना दि.25/04/2016

2) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम ,2016 (RPWDA 2016)नुसार दिव्यांगत्व तपासणी ,मूल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी मार्गदर्शक सूचना बाबत महाराष्ट्र शासन ,सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्रमांक : अप्रवि-2018/प्र.क्र .46/आरोग्य-6 नवीन मंत्रालय ,10 वा मजला ,मुंबई दि.14/09/2018


मा.महोदया ,

उपरोक्त संदर्भ क्र 1 व 2 नुसार जिल्हा शासकीय रुग्णाल रत्नागिरी कडून दिव्यांगत्व तपासणी ,मूल्यमापन व प्रमाणपत्र वितरण होणे अभिप्रेत आहे. परंतु "ऑटिझम"ची लक्षणे असणाऱ्या बालकांना **ऑटिझम** चे प्रमाणपत्र न देता ,बौद्धिक अक्षम चे प्रमाणपत्र देण्यात येते असे निदर्शनास आले आहे.त्यामुळे त्या बालकांच्या पुढील पूर्ण आयुष्याची दिशाच बदलून जाते.R.T.E.नुसार समावेशित शिक्षण मध्ये प्रवेश घेतला तर ऑटिझम च्या बालकांना देण्यात येणाऱ्या सोयी -सवलती ऐवजी बौद्धिक अक्षम च्या सोयी सवलती दिल्या

P.T.O.

आस्था दिव्यांग वकालत केंद्र, रत्नागिरी

पत्ता: छत्रपती शिवाजी स्टेडीयम, मच्छी मार्केट जवळ, मारुती मंदिर, रत्नागिरी 415 612.
ईमेल : surekhapathare@yahoo.com संपर्क: 9422725313, 9834440200



आस्था सोशल फाऊंडेशन रत्नागिरी

"We believe they can!" मुख्य कार्यालय: ब्लॉक नं ८, सुमंत कॉम्प्लेक्स, चैत्रबन, नाचने रोड, रत्नागिरी, महाराष्ट्र, (भारत
वेबसाईट: www.aasthasocialfoundation.com ईमेल: director@aasthasocialfoundation.c

जातात,ज्याचा ऑटिझम च्या बालकाला मुळीच उपयोग होत नाही.त्यांचे सेन्सरी इशुज अड्रेस होत नाही.मुल हळू हळू शाळा बाहय होते .पुढे या बालकांच्या सामाजिक ,आर्थिक पुनर्वसनाचा तर प्रश्नच येत नाही.

तरी मा.महोदयांना विनंती आहे की केंद्र शासनाच्या सूचनानुसार ऑटिझमचे लक्षणे असणाऱ्या बालकांचे शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार तपासणी होऊन ऑटिझम चे प्रमाणपत्र वितरण सुरु व्हावे ,जेणे करून ते प्रमाणपत्र फक्त आर्थिक लाभा करता न वापरले मुलांचे मुलभूत हक्क ,शिक्षण,आरोग्य ,सुरक्षितता,जगण्याचा अधिकार त्यांना मिळवून देण्यासाठी उपयोगी ठरेल.

जागतिक स्वमग्नता दिवसाच्या निमित्ताने आपल्याकडे केलेल्या या निवेदनाचा लवकरच आपण सकारात्मक विचार कराल अशी आशा आहे .

धन्यवाद !!!

आपले विश्वासू

आस्था दिव्यांग वकालत केंद्र
रत्नागिरी - ९८३४४४०२००

दि.06/04/2022 रोजी रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात 'ऑटिझमचे' प्रमाणपत्र वितरण प्रक्रिया सुरू करण्यासाठी आस्थाने जिल्हा शल्य चिकित्सकांना निवेदन दिले.

दिव्यांगत्वाच्या 21 प्रकारांमध्ये ऑटिझमचा देखील समावेश आहे. युनिक डिसॅबिलिटी आयडी कार्ड वितरणाची प्रक्रिया जिल्हा शासकीय रुग्णालयाकडून करण्यात येते. ऑटिझम अर्थात स्वमग्नतेची लक्षणे असणाऱ्या बालकांना मात्र ऑटिझमचे सर्टिफिकेट न मिळता त्यांना बौद्धिक अक्षम चे सर्टिफिकेट देण्यात येते. त्यामुळे या दिव्यांग बालकांच्या पूर्ण आयुष्याच्या पुनर्वसन प्रक्रियेची दिशा बदलून जाते. कारण अपंगत्वानुसार कोणत्या शैक्षणिक सवलती द्यायच्या हे शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. मुलांचे प्रमाण पत्रानुसार पहिलीपासून ते उच्च शिक्षणापर्यंत शैक्षणिक सवलती देण्याबद्दल सूचना प्राप्त आहेत. त्यामुळे दोन एप्रिल जागतिक स्वमग्नता जाणीव जागृती दिवसानिमित्त( ऑटिझम अवेरनेस डे) निमित्त आस्था सोशल फाउंडेशन रत्नागिरीच्या दिव्यांग वकालत केंद्राच्या वतीने संपदा कांबळे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर संगमित्रा फुले -गावडे यांना निवेदन दिले व

लवकरात लवकर ऑटिझम (स्वमग्नता ) चे लक्षणे असणाऱ्या बालकांना नियमानुसार ऑटिझमचे प्रमाणपत्र मिळावे अशी मागणी केली. याप्रसंगी आस्थाच्या सुरेखा पाथरे देखील उपस्थित होत्या.



दि.09-04-2023 रोजी अंध क्रिकेट संघाचे सराव शिबीर आयोजित करण्यात आले होते. संघ बांधणी च्या दृष्टीने सराव अत्यंत आवश्यक आहे. याबाबत समुपदेशन करण्यात आले. श्री.संजय शारदळ  यांना जीवनावश्यक वस्तू देण्यात आल्या.




दि.14 एप्रिल 2022 रोजी, महामानव,भारतरत्न डॉ.  बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आस्था सोशल फाऊंदेशन रत्नागिरी च्या वतीने  श्रीम. सुरेखा पाथरे,श्रीम.संपदा कांबळे व चि.आल्हाद सुरेखा पाथरे, यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



दि.19/04/2023 रोजी रमजाननिमित्त गरीब गरजू दिव्यांग इस्लामिक महिलांना प्रधान टी व आस्था च्या वतीने रेशन कार्ड देण्यात आली. शबाना सोलकर व जरीना नाईक रेशन किट स्वीकारताना.



दि.29-04-2022 रोजी समाज बंद संस्थेचे श्री सचिन आशा सुभाष यांनी संस्थेला भेट दिली. संस्थेचे दिव्यांगांसाठी असलेले कार्य समजून घेतले. समाजबंध संस्था महिलांच्या मासिक पाळीतील स्वच्छता व्यवस्थापन या विषयावर कार्यरत आहे. दिव्यांग महिला व विशेषतः बौद्धिक अक्षम ,सेरेब्रल पाल्सी ,ऑटिझमअ असलेल्या मुलींना मासिक पाळीना काळातील स्वच्छतेचे व्यवस्थापन योग्य पणे करता येत नाही, त्यामुळे खूप समस्या निर्माण होतात.

त्यांच्या आरोग्याचा प्रश्न बिकट होतो. त्यांच्या या काळातील वैयक्तिक स्वच्छता कोण करणार ? म्हणून काही वेळेस नको त्या वयात गर्भाशय काढून टाकण्याचा अंत्यन्त क्रूर व कटु निर्णय पालकां कडून घेण्यात येतो. त्यामुळे या विषयावर समाजबंध ने आस्था सोबत संयुक्त विद्यमाने दिव्यांग मुली व महिलांसाठी,काळजी वाहकांसाठी,पालकां साठी प्रशिक्षणाचे मॉड्युल ल तयार करावे. मुली व महिलां मधील वेगवेगळ्या अपंगात्वाचा विचार करून त्यांना येणारा समस्यांचा देखील विचार व्हावा. रत्नागिरी जिल्हयात पायलट प्रकल्प करून त्याचे यश अपयश पाहून हा प्रकल्प महाराष्ट्रभर नव्हे देशभर राबविण्याची आवश्यकता आस्थाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.




दि 09/05/2022 दापोली दिव्यांग धोकेधारकांच्या आर्थिक पुनर्वसनासाठी नगरपंचायत दापोली यांनी पुढाकार घ्यावा यासाठी माननीय जिल्हाधिकारी बी. एन.पाटील यांची आस्थाच्या सुरेखा पाथरे व आपण आलेल्या दिव्यांग बांधवांनी भेट घेतली. अतिशय मानवी पद्धतीने अनाधिकृत बांधकाम काढण्याचे नावाखाली दिव्यांग व्यक्तींचे छोटे मोठे व्यवसाय प्रशासनाने उध्वस्त केले. नवीन व्यावसायिक गळ्याचे काम होऊन देखील अद्यापही दिव्यांगांना गाळे वितरित करण्यात आलेली नाही. नवीन अनधिकृत पणे अनेकांनी बळकवले आहेत.दिव्यांगांच्या जागे बाबत विचार व्हावा अशी विनंती केली. या प्रसंगी नगर प्रशासन विभागाचे उपायुक्त श्री. तुषार बाबर उपस्थित होते.





दि.20/09/2022 रोजी रत्नागिरी तालुक्यातील दिव्यांगांसाठी युनिक डिसेबिलिटी आयडी कार्ड काढण्यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी येथे कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅप मध्ये अद्याप पर्यंत ज्या दिव्यांग जनानी युनिक डिसिबिलिटी आयडी कार्ड काढले नाही अशांसाठी ग्रामपंचायत द्वारे पुढाकार घेऊन त्यांना सिव्हिल हॉस्पिटल येथे आणण्यात आले होते. या दिव्यांग जणांचे केंद्र शासनाच्या स्वावलंबन या वेबसाईटवर नोंदणीकरण ग्रामपंचायत द्वारे करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सर्व प्रकारच्या दिव्यांग जणांची UDID साठी तपासणी करण्यात आली. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रविकिरण पुजार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी , श्री. यादव, गटविकास अधिकारी जे.पी.जाधव, डॉक्टर्स उपस्थित होते. या शिबिराच्या सुव्यवस्थेत संचलनासाठी आस्था सोशल फाउंडेशन रत्नागिरी च्या वतीने सुरेखा पाथरे यांनी काम पाहिले.






दि.26/27/28/29 सप्टेंबर 2022 रोजी डाऊ केमिकल प्रायोजित व भगवान महावीर विकलांग सहायता समिती आयोजित सहाय्यभूत साधने वितरण कॅम्प आयोजना मध्ये असताना अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. या कॅप बाबतची सर्व माहिती दिव्यांगांपर्यंत पोहोचवणे. दिव्यांगांची नोंदणी करणे. कॅम्पच्या दिवशी घरापासून कॅम्प पर्यंत येण्यासाठी दिव्यांगांना सोयी सुविधांबाबत फॅसिलिटेशन करणे. मोजमाप घेऊन प्रत्यक्ष साहेब साधन वेळेपर्यंत समन्वय साधने. तसेच सदर साहित्यसह दिव्यांग व्यक्ती सुखरूपाने घरापर्यंत पोहोचतील इथपर्यंत संपर्कात राहणे याप्रमाणे काम आस्था च्या कार्यकर्त्यांनी केले. इतर दिव्यांगांसह त्यामध्ये बौद्धिक अक्षमतेसह, सेरेब्रल पाल्सी दिव्यांगांना कॅलिपर, व्हील चेअर , सीपी चेअर त्यांचे वितरण करण्यात आले.



3 डिसेंबर जागतिक अपंग दिनानिमित्त एम के व्ही इंग्लिश स्कूल रत्नागिरी येथे आयोजित कार्यक्रमात दिव्यांगांसाठी कार्यरत संस्था म्हणून शाळेच्या विद्यार्थ्यांनी आस्था गौरव केला. या कार्यक्रमात आस्थाच्या श्रीम सुरेखा पाथरे ,श्री. संकेत चाळके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. समाज दिव्यांग जणांचे प्रति संवेदनशील व्हावा यासाठी दिव्यांगांचे जीवन व समस्या, दिव्यांगांच्या समाजाकडून असणारे अपेक्षा याविषयी चर्चा करण्यात आली. व मुलांनी देखील या ठिकाणी समाजातील दिव्यांगांच्या प्रती आम्ही संवेदनशील राहू अशी शपथ घेतली.




दि 03/12/2022 शामराव पेजे सभागृह जिल्हा परिषद रत्नागिरी येथे जिल्हा प्रशासनाकडून आयोजित ‘जागतिक अपंग दिनाच्या” कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय उदय सामंत यांच्या हस्ते जिल्ह्यातील सर्व मुख्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आस्था सोशल फाउंडेशन रत्नागिरी चा गौरव करण्यात आला.




सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग रत्नागिरी, समतापर्व अंतर्गत दि.04/12/2022 रोजी अपंग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 या कायद्याची माहिती देणारे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत समाजातील वंचित घटकांच्या उत्थानासाठी असणाऱ्या विविध कायद्यां बाबत समाजात जानवी जागृती करण्यात येत होती. यामध्येच समाजातील उपेक्षित घटक दिव्यांग यांच्यासाठी असलेल्या RPWD Act 2016 या कायद्यातील तरतुदी याबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी आस्था सोशल फाउंडेशन रत्नागिरी च्या श्रीम. सुरेखा

पाथरे तज्ञ म्हणुन व्यासपीठा वर उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला जिल्हास्तरीय विभाग प्रमुख , विविध संस्थांचे प्रमुख, दिव्यांग उपस्थित होते.




आस्था सोशल फाउंडेशन रत्नागिरीच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने "महिला आणि दिव्यांगत्व "- एक चिंतन या कार्यक्रमाचे आयोजन.

दि.07/03/2023 रोजी आस्था विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे थेरपी सेंटर, छत्रपती शिवाजी स्टेडियम, मारुती मंदिर रत्नागिरी येथे सकाळी 11 वाजता जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने उपरोक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये महिला आणि दिव्यांगत्व या विषयावर चिंतन करण्यात आले. अंध महिलांचे प्रश्न मांडण्यासाठी श्रीम. विजया मेस्त्री, सुनीता गोळपकर, संपदा कांबळे विचारपिठावर उपस्थित होत्या. अस्थिव्यंग महिला प्रतिनिधी सारा व समरीन करीम नाईक, श्रीम. रेणुका पड्यार,शबनम तहसीलदार, शिल्पा गोठणकर, पल्लवी पांचाळ यांनी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमात आपल्या दिव्यांग मुलांच्या मागे खंबीरपणे उभे राहणाऱ्या व त्यांचे आयुष्य घडविणाऱ्या "सुपर मॉम "1.सम्राज्ञी संजय चाळके, 2.योगिता राजेश पडवळ 3.झरीना करीम नाईक,4.प्रीताशा प्रभाकर घोसाळकर यांचा सत्कार आस्थाच्या सचिव सुरेखा पाथरे यांच्या हस्ते करण्यात आला. अपंगत्वावर मात करत उत्कृष्ट काम करणाऱ्या श्रीम.प्रीती रतिलाल पटेल, व्यवस्थापक ओबीसी महामंडळ यांना देखील सन्मानित करण्यात आले.दिव्यांग मुलांच्या माता, महिलांनी आपले प्रश्न पत्रकार परिषदेमध्ये मांडले.

ज्यात मुख्यतः दिव्यांग मुली व महिलांसाठी जिल्हा स्तरावर वसतीगृह असावे,बालकांसाठी डे- केअर युनिट ची आवश्यकता आहे,दिव्यांग महिलांच्या आरोग्यासाठी शासनाने विशेष

तरतुदी करण्याची आवश्यकता आहे, अपंगत्वाच्या टक्केवारीनुसार महिलांना सुविधांची आवश्यकता आहे,अंध दिव्यांग महिलांसाठी स्वयंचलन अर्थात मोबोलिटी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे,नोकरी व्यवसाय करणाऱ्या महिलांना आपल्या दिव्यांग मुलांना थेरपी,दवाखाना,शाळा, इत्यादी ठिकाणी ने आण करण्यासाठी प्रवास सुविधांची गरज आहे,हे व या सारखे अनेक प्रश्नाचे लेखी निवेदन उद्या महिला दिनी जिल्हाधिकाऱ्यांना देण्याचे ठरले. माता पालक नुरीन काझी,अकीला वस्ता,रेश्मा तांबोळी, मिताली नाचणकर, वैशाली पवार, कामिनी गांगन, कनीज महिमकर, रसिका झोरे, समृद्धी नेवरेकर, अमृता लोध उपस्थित होते.आस्था हीत चिंतक श्रीम.उमा दांडेकर, श्रीम.शुभांगी अत्रे,श्रीम. समृद्धी पतंगे यांनी कार्यक्रमात स्वयंसेवक म्हणुन काम पाहिले. कार्यकमाच्या यशस्वीतेसाठी संकेत चाळके यांच्या नेतृत्वाखाली आस्थाच्या सर्व कार्यकर्त्यांनी काम बघितले.

महिला आणि अपंगत्व, एक चिंतन, या कार्यक्रमात ठरल्याप्रमाणे महिलांच्या विविध मागण्यांचे निवेदन आस्था सोशल फाउंडेशन च्या वतीने श्रीम. सुरेखा पाथरे, संपदा कांबळे, शिल्पा गोठणकर, व पल्लवी पांचाळ यांनी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना दिले.

**दिव्यांग पुर्नवसन क्षेत्रात संस्थेचे खालील प्रकल्प कार्यान्वित आहेत.**

**1 आस्था शिघ्र निदान व शिघ्र हस्तक्षेप केंद्र रत्नागिरी :** आस्था शिघ्र,निदान व शिघ्र हस्तक्षेप केंद्रामध्ये 0 ते 6 वयोगटातील मुलांना वाचा उपचार, भौतिक उपचार,व्यावसायिक उपचार देण्यात येतात. आस्था निदान शीघ्र व शीघ्र हस्तक्षेप केंद्रात 0 ते 06 वयोगटातील सन 2022-23 वयोगटातील थेरपी घेतलेल्या दिव्यांग मुलांची यादी.

| अ.क्र. | मुलाचे नाव |
|---|---|
| 1) | तेजस संजय नेवरेकर |
| 2) | हर्ष सुरज नाचणकर |
| 3) | श्रेयांश सलील आरेकर |
| 4) | अम्मारा सुहेल काझी |
| 5) | ऋशीराज अमरसिंग राठोड |
| 6) | ओवी भिकाजीं ओर्पे |
| 7) | झयान असीम मुल्लाजी |
| 8) | आर्या सुशांत रेवाळे |
| 9) | जीत सचिन मोहिते |

| | |
|---|---|
| 10) | आयरा आतिफ हुशये |
| 11) | चिराग विश्वनाथ चौगुले |
| 12) | आर्वी अनिकेत जाधव |
| 13) | सौख्य  अमोल चव्हाण |
| 14) | काव्या प्रशांत घोसाळे |
| 15) | आयान जमीन साई |
| 16) | अनय विशाल टाकळे |
| 17) | वीर कमलाजी होटकर |
| 18) | संस्कार प्रशांत भाटकर |
| 19) | आदित्य दत्त अमित तळवणकर |
| 20) | श्रीश सतीश साळवी |
| 21) | परी संदेश चौधरी |
| 22) | शिफा तौसिफ काझी |
| 23) | धिवान मितेश गार्डी |
| 24) | शौर्य स्वरूप पाकळे |
| 25) | सान्वी किरण बागवे |
| 26) | जोहान मतीन जांभळीकर |
| 27) | फातिमा सनम भोंबल |
| 28) | जुनेद अब्दुलहिन जिक्रे |
| 29) | अरहम असाद वाडकर |
| 30) | वेद योगेंद्र सांबरे |
| 31) | सुहान अब्दुलमतीन काझी |
| 32) | प्रभास प्रशांत पोतदार |
| 33) | वेदांत प्रशांत फणसे |
| 34) | निर्भय योगेश ताम्हाणेकर |
| 35) | धन्वी मंगेश खामकर |
| 36) | शुभ्रा अमित काटकर |
| 37) | आर्यन सुमित मुळ्ये |
| 38) | प्रिन्सि कुलदीप वानखेडे |
| 39) | मानवा प्रकाश बेर्डे |
| 40) | शिवाय प्रकाश बेर्डे |
| 41) | प्राप्ती प्रकाश लाड |
| 42) | प्रांजल सिद्धार्थ शेटे |

| | |
|---|---|
| 43) | राजरत्न दीपक पवार |
| 44) | कबीर दीपक पवार |
| 45) | रोहन अन्सार  मापारी |
| 46) | जिजा दीपक पारकर |
| 47) | आराध्य अमित पवार |
| 48) | इसा फरीद खोत |
| 49) | समायरा स्वप्नील दाभोळकर |

**2) आस्था विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे थेरपी सेंटर :** आस्था विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे थेरपी सेंटरमध्ये  6 वर्षावरील  मुलांना वाचा उपचार, भौतिक उपचार,व्यावसायिक उपचार देण्यात येतात. सन 2022-23 मध्ये 06 वर्षा वरील  वयोगटातील थेरपी घेतलेल्या दिव्यांग मुलांची यादी

| अ.क्र. | मुलाचे नाव |
|---|---|
| 1) | त्रिशा राजेश भुजबळराव |
| 2) | छवी महेंद्रसिंग मीना |
| 3) | तन्वी अजित आग्रे |
| 4) | सिद्रा नासिर साखरकर |
| 5) | आर्मीन जाकीर तांबोळी |
| 6) | ललिता प्रेमसुख पारिख |
| 7) | दर्शन मंगेश माईन |
| 8) | यश विकास पवार |
| 9) | सार्थक संदीप शिंदे |
| 10) | रेहान कादर काझी |
| 11) | मुख्तीयार अब्बास वस्ता |
| 12) | जाहिद इब्राहिम  मजगावकर |
| 13) | निल विशाल भोले |
| 14) | आल्हाद सुरेखा पाथरे |

| | |
|---|---|
| 15) | आयेशा साजिद मुकादम |
| 16) | आदिबा इम्रान  माहीमकर |
| 17) | चिन्मय राजेंद्र मोकादम |
| 18) | सार्थक मिलिंद नाचणकर |
| 19) | वेदांत मिलिंद नाचणकर |
| 20) | दर्शील विनायक पेजे |
| 21) | श्रीनिवास राजेंद्र बांदिवडेकर |
| 22) | अब्दुल्ला मुस्ताक मंचेकर |
| 23) | सार्थक सचिन कांबळी |
| 24) | विराज दीपक चव्हाण |
| 25) | शार्दूल शरद गोठणकर |
| 26) | राज सुशांत सुर्वे |
| 27) | तेजय अनिल दांडगे |
| 28) | अजय रमेश झोरे |
| 29) | मनिष शशिकांत पवार |
| 30) | देवांग नागेश देसाई |
| 31) | खतीजा नसरत वस्ता |
| 32) | आस्था साईनाथ तांडेल |
| 33) | प्रशांत वसंत पवार |
| 34) | मोहम्मद असद नायकोडे |
| 35) | आराध्या पंढरीनाथ किलजे |
| 36) | प्रिन्स जयदीप कांबळे |
| 37) | मुजफ्फर इब्राहिम शहा |
| 38) | ओवी दीपक गांगण |

4 आस्था दिव्यांग हेल्पलाईन रत्नागिरी:च्या मार्फत दिव्यांगाना खालील मदत देण्यात येते.




**आस्था मार्फत सन 2022-23 मध्ये UDID करून दिलेल्या दिव्यांगांची यादी**

1) प्रियांका सुरेश पवार 2) ओवी भिकाजी ओरपे 3) चिराग विश्वनाथ चौगुले 4) बेबी जलाल मुजावर 5) अजित धोंडू चव्हाण 6) तन्वी अजित आग्रे 7) अक्षय धोंडू चव्हाण 8) नियाज फकीर कालसेकर 9) प्रतीक गणपत सुर्वे 10) अनिकेत सुरेश चिपळूणकर 11) गौरव प्रफुल्ल पवार 12) अब्दुल्ला मुस्ताक मंचेकर 13) सुप्रिया आकाश कोडविलकर 14) दिलीप शंकर गुडेकर 15) लावण्य अर्जुन माचीवले 16) यशोदीप दिनेश

चाळके 17) सरिता शांताराम बेंडके18) रमेश मारुती गिरकर 19) सुनील बाबुराव लोंढे 20) संगीता वसंत सावंत 21)अब्दुलरेहमान सईल मोगल 22)हबीबा सहीम तांडेल 23) शार्दुल शरद गोठणकर 24) मुजफ्फर इब्राहिम शाह 25) ललिता प्रेमसुख पारिख 26) रक्षंदा महेश दळवी 27) प्रशांत वसंत पवार 28) हालीम अनास मस्तान 29) अब्दुल माजीद गफूद हजू 30) शरद काशीराम देसाई 31) चंद्रपाल चंद्रकांत जाधव 32) सऊद महमूदमिया दिवेकर 33) दर्शील विनायक पेजे 34) शरफुद्दीन सुलेमान पांढरे 35) बाब्या सुभाष माईन 36) वासिक बशीर अलजी 37) आल्हाद सुरेखा पाथरे 38) श्रीपाद बालाजी जवरथ 39) तुलसी रमेश लिबे 40) प्रमोद महादेव मोहिते 41)मोसीन ए सत्तार सय्यद 42) आयान जमीर साई 43) निधी प्रमोद मोहिते 44) जैनब निसार शेरखान 45) विष्णू महादेव गोरे 46) मिरा मुकुंद गोरे 47) सुवर्णा सहदेव धामण 48) भाग्यश्री भार्गव कामत 49) अर्जुन मोहन गोलतकर 50) अश शब्बास म्हसकर 51) रोहन विनय गुरव 52) अनंत लक्ष्मण कामेरकर 53) कांचन रमेश सुर्वे 54) द्विजा शैलेश लोध 55) अर्पिता अजित गुरव 56) सम्रान मोहम्मद शफी पाटणकर 57) अरुण दत्ताराम खानविलकर 58) वेद योगेंद्र सांबरे 59)ओवी दिपक गांगण 60) चिन्मय राजेंद्र मुकादम 61) सायली सुमित भोसले 62) लक्ष्मण कृष्णा भोसले 63) नुआज खल्लील शेख 64) धोंडू गणपत आडविलकर 65) शहाब मेहबूब पठाण 66) अशोक महादेव शिवगण 67) सुचिता सूर्यकांत फडतरे 68) यश रमेश लांजेकर 69) गोविंद शंकर खरात 70) प्रतीक प्रमोद सोनवडकर 71) मोहम्मद असद समीर नायकोडे 72) यासीन अहमद कोतवडेकर 73) अजित पुरुषोत्तम तेंडुलकर 74) अरुण देऊ राडये 75) अनिल तुकाराम रसाळ 76) कार्तिक विशाल पालकर 77) सागर अशोक पवार 78) रूपाली सागर पवार 79) अनिल सदानंद सुर्वे 80) रुहान अन्सार मापारी 81) सुशीला सुरेश लोहार 82) साक्षी राजेश पवार 83) मनीष शशिकांत पवार 84) उदय शेखर साळवी 85) जुनेद अब्दुलहाई जिक्रे 86) धन्वी मंगेश खामकर 87) चंपा नवलसिंग बोहरा 88) भरत रामभाऊ लोहकरे 89) शिल्पा रामचंद्र गोठणकर 90) पल्लवी प्रभाकर पांचाळ

**2) आस्था दिव्यांग हेल्पलाईन मार्फत नॅशनल ट्रस्ट अंतर्गत निरामया आरोग्य विमा सन 2022-23 करिता निरामया कार्ड रीनिव्हल,नवीन कार्ड व मेडिकल क्लेम केलेल्या मुलांची यादी**

**3) 1.रिनिव्हल**

| अ.क्र. | मुलाचे नाव | अपंगत्वाचा प्रकार |
|---|---|---|
| 01 | आल्हाद पंकज जोशी | बौद्धिक अक्षम |
| 02 | यश विकास पवार | बौद्धिक अक्षम |
| 03 | राज विनोद चव्हाण | बौद्धिक अक्षम |
| 04 | आरमीन झाकीर तांबोळी | बौद्धिक अक्षम |
| 05 | त्रिशा राजेश भुजबळराव | बौद्धिक अक्षम |
| 06 | मारिया साजिद मुकादम | बौद्धिक अक्षम |
| 07 | आदिबा इम्रान माहिमकर | बौद्धिक अक्षम |
| 08 | राज सुशांत सुर्वे | बौद्धिक अक्षम |
| 09 | मनीष शशिकांत पवार | बौद्धिक अक्षम |
| 10 | वफा मुराद बोंद्रे | सेरेब्रल पाल्सी |
| 11 | रेहान अब्दुल कादर काझी | बौद्धिक अक्षम |
| 12 | वेदांत मिलिंद नाचणकर | बौद्धिक अक्षम |
| 13 | सार्थक मिलिंद नाचणकर | बौद्धिक अक्षम |
| 14 | जाहिद इब्राहीम मजगावकर | बौद्धिक अक्षम |
| 15 | मल्लिका देवदत्त शिवलकर | बौद्धिक अक्षम |
| 16 | करण प्रकाश भोसले | बौद्धिक अक्षम |
| 17 | राज मनोज घोसाळकर | बौद्धिक अक्षम |
| 18 | आदित्य नेताजी कांबळे | बौद्धिक अक्षम |
| 19 | अथर्व नरेश मोरे | बौद्धिक अक्षम |
| 20 | शांभवी ऋषिकेश सरदेसाई | बौद्धिक अक्षम |
| 21 | दर्शन मंगेश माईण | बौद्धिक अक्षम |
| 22 | सुरक्षा चंद्रकांत पाटील | बौद्धिक अक्षम |
| 23 | पायल विलास उदेग | बौद्धिक अक्षम |
| 24 | श्वेतांबरी चंद्रकांत सुर्वे | बौद्धिक अक्षम |
| 25 | आयुष सतीश कदम | बौद्धिक अक्षम |
| 26 | स्नेहांक संदीप आडविलकर | सेरेब्रल पाल्सी |
| 27 | मोहम्मद समी वसीम शेख | बौद्धिक अक्षम |

## 2. नवीन कार्ड्स

| अ.क्र. | मुलाचे नाव | दिव्यांगत्वाचा प्रकार |
|---|---|---|
| 01 | स्वरांगी आशिष भिडे | सेरेब्रल पाल्सी |
| 02 | अनुज रवींद्र कोलगे | बौद्धिक अक्षम |
| 03 | यश राजेंद्र खातू | बौद्धिक अक्षम |
| 04 | जुई जितेंद्र चव्हाण | बौद्धिक अक्षम |
| 05 | सार्थक संदीप शिंदे | बौद्धिक अक्षम |
| 06 | शामी शामलिंग गुरव | बौद्धिक अक्षम |
| 07 | सांची प्रशांत नाईक | सेरेब्रल पाल्सी |
| 08 | तेजय अनिल दांडगे | बौद्धिक अक्षम |
| 09 | सुरक्षा चंद्रकांत पाटील | बौद्धिक अक्षम |
| 10 | सफा शाकीर होडेकर | सेरेब्रल पाल्सी |
| 11 | अब्दुल्ला सलीम होडेकर | बौद्धिक अक्षम |

## 3.मेडिकल क्लेम

| अ.क्र. | मुलाचे नाव | अपंगत्वाचा प्रकार |
|---|---|---|
| 1 | आल्हाद पंकज जोशी | बौद्धिक अक्षम |
| 2 | आदिबा इम्रान माहिमकर | बौद्धिक अक्षम |
| 3 | त्रिशा राजेश भुजबळराव | बौद्धिक अक्षम |
| 4 | मनीष शशिकांत पवार | बौद्धिक अक्षम |
| 5 | वेदांत मिलिंद नाचणकर | बौद्धिक अक्षम |
| 6 | सार्थक मिलिंद नाचणकर | बौद्धिक अक्षम |
| 7 | जाहिद इब्राहीम मजगावकर | बौद्धिक अक्षम |
| 8 | तेजय अनिल दांडगे | बौद्धिक अक्षम |
| 9 | पायल विलास उदेग | बौद्धिक अक्षम |
| 10 | आरमीन झाकीर तांबोळी | बौद्धिक अक्षम |
| 11 | करण प्रकाश भोसले | बौद्धिक अक्षम |

| | | |
|---|---|---|
| 12 | रेहान अब्दुल कादर काझी | बौद्धिक अक्षम |
| 13 | दर्शन मंगेश माईण | बौद्धिक अक्षम |
| 14 | शमी शामलिंग गुरव | बौद्धिक अक्षम |
| 15 | अनुज रवींद्र कोलगे | बौद्धिक अक्षम |